नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/07/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## जाती विषयक शिवीगाळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 500 मी अंतरावरील जिवन विकास शाळे समोर उमरेड येथे दिनांक 15/07/2021 चे 08:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शुभम विरेंद्र शेंडे, वय 25 वर्ष, रा. चिचघरे ले आउट परसोडी उमरेड यांची गोकुल बार जवळ पानठेल्याची दुकान असुन लोंकाची भिड असल्याने आरोपी पत्रकार नामे– राहुल गुप्ता, रा. उमरेड हा तेथे आला व म्हणाला की, '' शुभम गांजा बेचता है, लोगोको गांजा पिलाता है, तु मुझे गांजा बेचने के बदोलत मे पैसे दिया कर नही तो मै पुलीस को खबर देता हुॅ, और मेरे चायनल पर तेरी न्युज चलाता हुॅ'' असे फिर्यादीला वारंवार धमकी देत असल्याने त्याचे भितीमुळे कंटाळुन पानठेला बंद केला व ठेक्याने शेती घेवून शेतीचे काम करीत होता. फिर्यादी हा आपले एमएच– 40/बीवाय– 1345 क्रमांकाचा मापेड वर आपले मित्र अक्षय पाटील, आकाश गजभिये याचे सह खर्रा खाण्यास जात असतांना जिवन विकास शाळेचे समोर उभा आरोपी होता. तेव्हा आरोपीने फिर्यादीस आवाज मारला व आरोपी त्याचे मित्र थांबले असता आरोपी म्हणाला की, ''क्या शुभम तु गांजेका काम पहले पानठेलेसे करता था अभी घरसे करता है, पैसा नहीं देता तेरा गेम बना दुगां मुझे 20,000/–रू. हर महीने चाहीये'' असे म्हणुन जातीविषीयक व अश्लिल शिवीगाळ केली. तेव्हा फिर्यादी आरोपीस म्हणाला की, गाली गलोच मत कर यावरून आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉड डोक्यावर मारण्यास उचलला असता फिर्यादीने उजव्या हात अडवला असता हात जखमी झाला. तसेच आरोपीने धमकी दिली की, ''तु माझे विरूद्ध तक्रार दिली तर मी तुझी पो स्टे उमरेड येथे पैसे हिसकल्याची तक्रार देईन'' असे म्हणुन धमकवत असंताना फिर्यादीचे मित्र फिर्यादीस वाचवण्यास धावले असता आरोपी हा लोखंडी रॉड घेवुन त्याचे मोटरसायकलने पळुन गेला. फिर्यादीने मेडीकाल कॉलेज नागपुर येथे उपचार केला असता डॉक्टरांनी हात फ्रक्चर असल्याचे सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 326, 385, 594, 506 भा.द.वि.सहकलम 3(2)(व्हि),3(1)(आर)(एस) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. भिमराव टेळे 9923388766 उपविभगीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग उमरेड हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर बालाजी नगर उमरेड येथे दि. 15/07/2021 चे 23.00 वा. ते ते दि. 16/07/2021 चे 02.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– शांम्पु बापुराव वरधने वय 32 वर्ष, रा. बालाजी नगर उमरेड यांची वेकोली मूरूपार येथे सेकंड शिफट असल्याने दि. 15/07/2021 चे 13.00 वा. पत्नीला तीच्या वडीलाकडे सोडले. पून्हा घरी येउन 14.00 वा. घराला लॉक लावून डयूटीवर गेले व डयूटीवरून 16/07/2021 ला रात्री 02.00 वा. दरम्यान घरी आले असता दरवाजाच्या कोंडा तुटलेला दिसला. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घरातील सोन्या–चांदीचे दागिने कि. 1,99,000/–रू. व नगदी 13,000/–रू. असे एकुण 2,12,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रशांत खोब्रागडे 8888817183 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनीः— दिनांक 16/07/2021 चे 14.00 वा. दरम्यान पीडित/फिर्यादी वय 46 वर्ष हि आपल्या घरी हजर असतांना आरोपी नामे— भागवत गोमकाळे, रा. भागेमाहेरी हा फिर्यादीचे घरासमोर अंगणात येवून तिला म्हणु लागला की, ''तु इथे विटा का टाकु देत नाही, हे घर मी विकत घेतले आहे'' असे बोलुन अशिलल शिवीगाळ केली. तसेच आरोपीने फिर्यादीस पाहुन घेण्याची धमकी दिली. यानंतर आरोपीने फिर्यादीला पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 294, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बाबापोषाक मेश्राम 9765236916 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर